# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ९५-२२ दिनांक :- ३१/०३/२०२२

## वेश्याव्यवसाय करणा-या महिला दलालास अटक करुन १६ वर्षाच्या एका अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकास यश.

दिनांक ३०.०३.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध भाईंदर पथकाचे सहा.पो.उपनिरी श्री. उमेश पाटील यांना गोपनीय बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल काजल ही वेश्यागमनाच्या मोबदल्यात गिऱ्हाईकांना अल्पवयीन मुली पुरवित असून ती मिरारोड रेल्वे स्टेशनचे रिक्षा स्टॅन्डजवळील बस स्टॅन्डजवळ, मिरारोड पूर्व येथे अल्पवयीन मुलीस घेवून येणार आहे.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री एस एस पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना मिरारोड रेल्वे स्टेशनचे रिक्षा स्टॅन्डजवळील बस स्टॅन्डजवळ, मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक ३०/०३/२०२२ रोजी १५.२० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल काजल चंदन रा. मुंबई हिने १६ वर्षाच्या एका अल्पवयीन मुलीला वेश्यागमनाचासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाचा मोबदला म्हणून १५,०००/- रुपये रक्कम ठरवुन पुरुष गिऱ्हाईकाकडुन रक्कम स्विकारल्याने महिला आरोपी काजल चंदन हिस ताब्यात घेवुन अल्पवयीन मुलीची सुटका केली आहे. सदर बाबत सपोउनि. उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे महिला आरोपी काजल चंदन रा. मुंबई हिचेविरुध्द तक्रार दिल्याने नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I २१८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३६६ (अ), ३७०(१)(४), ३७२ अ.व्या.प्रति. अधि. १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, (गुन्हे), पोलीस उप आयुक्त, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, सहापोउनि. उमेश पाटील, विजय निलंगे, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोहवा/०८००३ सुप्रिया तिवले, चा.पोहवा/०६१०६ गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---